# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक: 2/एनजीसी/अेआयसीटीई-मान्यता/2013/५७७
दिनांक : 09 APR 2013

**अधिसूचना**

राज्यात सुरू असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए व हॉटेल मॅनेजमेंट पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष 2013-14 करीता मंजूर अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदवाढ, प्रवेश क्षमतेत वाढ - घट, अभ्यासक्रम बंद, नवीन अभ्यासक्रम इ. बाबत दि. १०.०४.२०१२ पर्यंत मान्यता देण्यात येणार आहेत. म्हणून सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाना कळविण्यात येते की, त्यांना परिषदेकडून प्राप्त होणा-या मान्यतेस अनुसरून त्यांनी या संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉगइन करून संस्थेस परिषदेने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ-घट व इतर माहिती दि. 12.04.2013 पर्यंत अद्ययावत करावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष 2013-14 ची प्रवेश प्रक्रीया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या माहितीचा विचार होणार नसल्याने याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीश: लक्ष घालून माहिती अद्ययावत करावी.

येथे असेही सूचित करण्यात येते की, संचालनायाच्या संकेतस्थळी माहिती अद्ययावत केलेल्या माहितीची छाननी तथा तपासणी सहसंचालक, विभागीय कार्यालये यांचेमार्फत करण्यात येईल. म्हणून संबंधित संस्था प्रमुखांनी त्यांची संचालनालयाच्या संकेतस्थळी भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्रांसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयांत त्यांनी दिलेल्या दिनांकास प्रत्यक्ष उपस्थित राहून उपलब्ध करुन देऊन संबंधित कागदपत्रांचा 1 संच त्यांचेकडे जमा करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

1) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रामाच्या संस्थांनी अद्ययावत केलेली माहिती व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेली माहिती यांची पडताळणी तथा तपासणी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करुन दि. 14.04.2013 पर्यंत माहितीची तपासणी करण्यात यावी. तसेच तपासणीत काही त्रृटी तथा तफावत आढळल्यास आपण संचालनलायाच्या संकेतस्थळी लागईन करुन माहितीची दुरस्ती संबधित संस्थेकडून करुन घ्यावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष 2013-14 साठीची शासन मान्यता, प्रवेश प्रक्रीया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने त्यात काही त्रृटी उद्भवल्यास आपणांस जबाबदार धरण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

2) सिस्टीम मॅनेजर, तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, कार्यासन क्रमांक 3, संगणक कक्ष, मुंबई
त्यांना कळविण्यात येते की, सदर अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिद्ध करावी.

H:\variation 2013\notification 2013.doc